सायबर सुरक्षेचे धडे विद्यार्थ्यांपर्यंतय न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये जनजागृती अभियान

जळगाव,ऑगस्ट रू डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी न्यू इंग्लिश मीडियम स्कूल येथे विशेष सायबर अवेअरनेस सत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना इंटरनेटचा सुरक्षित वापर, सोशल मीडियावरील ध ोके, ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार आणि त्यापासून बचावाचे उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमात महाराष्ट्र सायबर जनजागृती अभियानांतर्गत सायबर वॉरियर्स विद्या विशाल सोनवणे आणि साक्षी तानाजी पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर गुन्ह्यांच्या विविध ा पैलूंवर प्रकाश टाकला. फिशिंग लिंक, बनावट वेबसाइट्स, ओटीपी फसवणूक, फोटो मॉर्फिंग, सायबर बुलिंग आणि सोशल मीडिया सुरक्षेबाबत प्रत्यक्ष उदाहरणांसह माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना विषय अधिक चांगल्या प्रकारे समजावा यासाठी फनपबा भ्मंस थ्वनदकंजपवद तर्फे उपलब्ध करून देण्यात आलेल्या सायबर सुरक्षा मार्गदर्शक पुस्तिकांचे वितरण करण्यात आले. या पुस्तिकांमधील माहितीचा वापर करून विद्यार्थी भविष्यात सुरक्षित डिजिटल व्यवहार करू शकतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. शाळेचे प्राचार्य एस. एस. पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. आर. बी. आमले सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण झाली असून कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सुरक्षित डिजिटल नागरिक बनण्याची शपथ घेतली.

लगातार तीसरे दिन भी हुई मूसलाधार बारिश

तीन दिन में 116.6 मिमी बरसा पानी, कक्षा 1 से 8 तक के सभी स्कूल बंद

प्रयागराज। लगातार तीसरे दिन बारिश का सिलसिला जारी है। मंगलवार से शुरू हुई बारिश बुधवार के बाद गुरुवार को भी रुक-रुककर होती रही। गुरुवार सुबह करीब 3 बजे से ही बारिश शुरू हो गई। इससे शहर के कई हिस्सों में जलभराव की स्थिति